पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१८/कावि/६७४/२०२४,
दिनांक २२/०७/२०२४.

**विषय : - क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग अथवा पक्षघात झालेल्या अधिकारी/ कर्मचा-यांना दयावयाच्या सवलतीबाबत..**

परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट – तीन मधील नियम ७९ मध्ये क्षयरोग /कर्करोग/कुष्ठरोग अथवा पक्षघात इत्यादी आजाराबाबत रजेच्या तरतुदी नमुद केलेल्या आहेत. सदर रजेच्या तरतुदी अधिकारी/कर्मचा-यांना लागू आहेत. तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचारी क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग अथवा पक्षघात इत्यादी आजाराने ग्रस्त असलेल्या कर्मचा-यांच्या रजा तसेच त्यांना नियमानुसार देय असणारी विशेष रजा मंजूर करण्याची कार्यवाही महापालिकेतील अन्य विभागातील आस्थापना लिपिकाकडून केली जात नसलेबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. सदरची बाब योग्य नाही.

सदरचे परिपत्रकान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट - तीन नियम ७९ मध्ये क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग अथवा पक्षघात इ. आजाराबाबत रजेच्या तरतुदी नमुद केलेल्या आहेत. सदर तरतुदीनुसार आवश्यक ते कागदपत्रे तपासून देय असणारी विशेष रजा नियमानुसार मंजुर करण्याची कार्यवाही करावी. याबाबत तक्रारी आल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति :-
सर्व शाखाप्रमुख/ विभागप्रमुख,
२/- सदरचे परिपत्रक सर्व कर्मचा-यांना निदर्शनास आणून देण्यात यावे.